मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 20 मे 2024 | पान- 1

# पोलिसांचे अतिक्रमणाकडे दुर्लक्ष;पावतीकडे लक्ष

## स्थानिक ग्रामपंचायत व एमआयडीसी प्रशासनाचे दुर्लक्ष : अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्थानिक ग्रामपंचायत व एमआयडीसी प्रशासनाचे दुर्लक्ष, गाववाल्यांची हप्ते वसुली तसेच स्थानिक पोलिसांच्या कृपाशीर्वादाने हिंजवडीचा आठवडे बाजार दर रविवारी शिवाजी चौकातील वर्दळीच्या मुख्य रस्त्यावरच भरला जातो. त्यामुळे वाहतुकीचा फज्जा उडला जात असून वाहतूक पोलीस या पथारीवाल्यावर कारवाई करण्याऐवजी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकावर दंडात्मक कारवाई करून वसुली करण्यात मग्न असल्याचे चित्र आयटीनगरी हिंजवडीत पाहायला मिळत आहे.

हातगाडी व टेम्पोत माल घेऊन येणारे फळ व भाजीविक्रेते शिवाजी चौकात एमआयडीसीच्या मुख्य रस्त्यावरच छत्र्या लावून आपली दुकाने थाटून बसत असल्याने रहदारीला अडथळा ठरणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करणार कोण? असा प्रश्न हिंजवडीकरांसह आयटीयन्स व प्रवाशांना पडला आहे.

ग्रामपंचायतीने हिंजवडी पोलिसांच्या मदतीने ॲक्शन घेत रस्त्यावर दुकाने थाटणाऱ्या काही विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई केली होती. परंतु पोलिसांकडून सातत्याने कारवाई होत नसल्याने काही महिन्यातच परिस्थिती पुन्हा जैसे थेच पाहायला मिळत आहे. एकमेकांकडे बोटे दाखवून टोलवाटोलवी करणारे ग्रामपंचायत एमआयडीसी व पोलीस प्रशासन सद्या मूग गिळून गप्प असल्याने हिंजवडी एमआयडीसीच्या मुख्य रस्त्यावर भरणारा आठवडे बाजार सर्वांसाठी डोकेदुखी बनत आहे.बाजारामुळे रस्त्याच्या एकाच बाजूने वाहने जातात. परिणामी मेझा 9 हॉटेल ते शिवाजी चौकापर्यंत वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या जातात.



> “ एमआयडीसी ग्रामपंचायत यांनी पुढाकार घेऊन पोलिसांच्या सहकार्याने रस्त्यावरील विक्रेत्यांवर संयुक्त कारवाई केली पाहिजे. केवळ वाहतूक पोलिसांची जबाबदारी आहे असं कुणाचं म्हणणं असेल तर ते चुकीचे आहे.
> - एम. के. आदलिंग, सहाय्यक निरीक्षक हिंजवडी वाहतूक शाखा.

### रस्त्यावरील अतिक्रमणाचा मुद्दा थेट उपमुख्यमंत्र्यांच्या कानावर

» हिंजवडी आयटी परिसरात सर्व रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. त्यातच मेट्रोचे काम सुरू असल्याने या कामासाठी रस्त्याच्या दुतर्फा बॅरिगेट्स लावल्याने आधीच आयटी उद्यानाचे रस्ते अरुंद झाले आहेत. त्यातच या अनधिकृत आठवडे बाजाराची आणखी भर पडत असल्याने हे रस्ते मोकळे करण्याची जबाबदारी पोलीसांची नाही का? असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. रस्त्यावरील अतिक्रमणाचा व त्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न येथील सोसायटीधारकांनी थेट राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मागील महिन्यात सोसायटीधारकांच्या संवाद मेळाव्यात देखील उपस्थित केला होता. त्यामुळे पालकमंत्री पुढील काळात हिंजवडीच्या अनेक समस्यांबाबतीत काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### हिंजवडी वाहतूक विभागाला सक्षम अधिकाऱ्याची गरज

» गेले दोन वर्षे हिंजवडी वाहतूक विभागाचा कार्यभार पोलीस निरीक्षकाऐवजी एका सहाय्यक पोलीस निरीक्षकाकडे आहे. त्यामुळे हिंजवडी सारख्या अतिसंवेदनशील व वाहतुकीच्या समस्या असलेल्या वाहतूक विभागाला सक्षम व खमक्या अधिकारी का नियुक्त केला जात नाही, असा सवाल आयटीतील रहिवाशांनी उपस्थित केला आहे.

# गॅस चोरी करतानाच कंटेनरचा भीषण स्फोट!


## भीषण स्फोटात दोन गाड्या जळून खाक : सुदैवाने जीवितहानी टळली आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील चाकण-शिक्रापूर रस्त्यावर असणाऱ्या शेल पिंपळगाव येथे गॅस चोरी करत असताना भीषण स्फोट झाल्याची घटना समोर आली आहे. आज पहाटेच्या सुमारास ही घटना घडली आहे. स्फोटात दोन गाड्या जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. तर यात सुदैवाने जीवितहानी टळली आहे.

घडले असे की, शेल पिंपळगाव परिसरात गॅस कंटेनर उभा होता. या गॅस कंटेनरमधून काही व्यक्ती घरगुती आणि कमर्शियल टाक्यांमध्ये गॅस चोरी करत होते. मात्र, अचानक या गॅस टाकीचा स्फोट झाला. हा स्फोट इतका भयानक होता की, आजूबाजूच्या परिसरात हादरा बसला. स्फोटामुळे मोठी आग लागली, ढाब्यासह तिथं पार्क असणाऱ्या इतर वाहनांना आग लागून ही आग पसरत गेली आणि आजूबाजूच्या घरांनाही घेरले. मात्र घटना घडल्यानंतर गॅस चोरी करणारे घटनास्थळावरून पसार झाले आहेत.

सदर घटना अंगावर शहारे आणणारी अशीच होती. दिवसाढवळ्या असा प्रकार घडला असता तर मोठी हानी देखील होण्याची शक्यता होती, असे मत प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी व्यक्त केले आहे. गॅस चोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून जोर धरु लागली आहे.



### गॅस तस्करांवर आळा घालणे गरजेचे

» घटनेची माहिती मिळताच चाकण पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून पोलिसांकडून तपासकार्य सुरू आहे. काही दिवसांपूर्वी पिंपरी चिंचवड येथे देखील असाच गॅस स्फोट झाला होता. तेव्हा देखील गॅस चोरीचा प्रयत्न झाल्याचे समोर आले होते. यामुळे नागरिकांना आपला जीव गमविण्याची देखील वेळ येऊ शकते. तर या गॅस तस्करांवर आळा घालणे गरजेचे आहे, अशी मागणी होतेय.

# डेंग्यूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी सज्ज राहा

## पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाचे आवाहन : डबकी साचून डासांची पैदास होण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

– पावसाळा सुरू होताच डेंग्यूचा प्रादूर्भाव वाढू लागतो. मागील दोन आठवड्यांत झालेल्या अवकाळी पावसामुळे ठिकठिकाणी पाण्याची डबकी साचून डासांची पैदास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे डेंग्यूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी नागरिकांनी सोसायटीसह परिसरात पाण्याची डबकी साचणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी. उत्पतीची ठिकाणे नष्ट करावी, असे आवाहन आरोग्य विभागाचे सहसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी केले आहे.

राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त (दि. १६) निमित्ताने जिल्हा हिवताप विभागाकडून जनजागृती केली जात आहे, तसेच या आजाराचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी उपाययोजनांसह आवाहनही केले जात आहे. डेंग्यू आजाराचा प्रसार हा एडिस इजिप्ती या डासाच्या चावण्यापासून होतो. त्याची उत्पती साठलेल्या स्वच्छ पाण्यात होते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या घरातील पाणी साठवणुकीचे भांडे आठवड्यातून एकदा रिकामे व कोरडे करून भरावे. घराभोवतीचा परिसर स्वच्छ राहील, याची काळजी घ्यावी. त्यामुळे डासांची निर्मिती व पर्यायाने हिवताप, डेंग्यूचे प्रमाण कमी होईल.




> “आपल्या परिसरातील पाण्याची डबकी नष्ट करावीत. आजाराची लक्षणे दिसताच अंगावर दुखणे न काढता, तात्काळ प्राथमिक, तालुका आणि जिल्हा रुग्णालयात जाऊन तपासणी करून घ्यावी. डेंग्यूची तपासणी करावी आणि आराम करावा.”
> **- डॉ. राधाकिशन पवार, सहसंचालक , आरोग्य विभाग, पुणे**

डेंग्यू हा रक्त शोषणाऱ्या डासांच्या माध्यमातून एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तिला संसर्ग होणारा विषाणूजन्य आजार आहे. प्रामुख्यानं डासांची एडिस इजिप्ती ही प्रजाती डेंग्यू पसरवण्यास कारणीभूत असते.

महाराष्ट्र आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे यांनी याबाबत बीबीसीबरोबर बोलताना सविस्तर माहिती दिली आहे.

डेंग्यूलाच बोनब्रेक फिव्हर किंवा (हाडं मोडून काढणारा ताप) असंही म्हटलं जातं. या तापामुळं काही जणांना हाडं आणि स्नायूंच्या प्रचंड वेदनांचा सामना करावा लागतो.

प्रामुख्यानं NS-1, IGM आणि IGG या तीन चाचण्यांच्या माध्यमातून डेंग्यूचं निदान होतं, अशी माहिती भोंडवे यांनी दिली.

यात प्रामुख्याने दोन प्रकार असतात. डेंग्यू ताप (डी.एफ.) आणि डेंग्यू रक्तस्त्रावी ताप (डी.एच.एफ.). यातील दुसऱ्या प्रकारच्या तापामुळं गंभीर स्थिती निर्माण होऊन, जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असते.

### काय घ्यावी काळजी..

» डासांच्या उत्पत्तीची साधने नष्ट करावा.
डासोत्पत्ती ठिकाणी गप्पी मासे सोडावेत.
पाण्याच्या साठ्यांना घट्ट झाकण बसवावे.
घरातील कूलर, फ्रीजचा डीप पॅन नियमित स्वच्छ ठेवावा.
गटारी वाहती करावीत आणि छोटे खड्डे, डबकी बुजवावीत.
अंगभर कपडे घालावेत.
झोपताना मच्छरदानी, डास प्रतिबंधक साधने वापरावी.

### डेंग्यूच्या आजाराची लक्षणे

» तीव्र डोकेदुखी.
डोळ्यांच्या खोबणीत वेदना.
सांधेदुखी, अंगावर पुरळ येणे.
भूक मंदावणे, उलट्या होणे.
तोंडाला कोरड पडणे, रक्तमिश्रित काळसर संडास होणे.

# शहरातील तरुण-तरुणीचा कारच्या धडकेत मृत्यू

## पुण्यात मध्यरात्री थरार, मद्यधुंद अवस्थेत अती वेगाने गाडी चालवणाऱ्याने दोघांना चिरडले

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणी नगर विमाननगर परिसरात रात्री उशिरापर्यंत हॉटेल व पब्ज सुरु असतात. एकीकडे रात्री उशिरापर्यंत सुरू असणाऱ्या आस्थापनांवर कारवाईचा आदेश पोलीस आयुक्तांनी दिलेले आहेत. मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही होताना दिसून येत नाही. त्यामुळे अशाप्रकारे भीषण अपघात घडत आहेत.

पुणे शहरात पुन्हा एक भीषण अपघात झाला आहे. पुण्यातील एका प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाने मद्यधुंद अवस्थेत भरधाव वेगाने गाडी चालवत दोघांना धडक दिली. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. हा अपघात शनिवारी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास कल्याणीनगर



### अपघाताचे व्हिडिओ सोशल मीडियावर

» या अपघाताचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. कल्याणी नगर भागात झालेल्या अपघाताची पुणे पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. आरोपीला ताब्यात घेतला असून त्याच्यावर येरवडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गाडी 200 च्या स्पीडने होती, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. अपघातानंतर कारमधील एअर बॅग उघडल्या होत्या. कारमधून तीन मुले बाहेर पडले. लोकांनी त्यांना चांगलाच चोप दिल्याचे प्रत्यक्षदर्शींनी लोकाने सांगितले.

पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल अपघात करणाऱ्या अल्पवयीन करून ताब्यात घेण्यात आलेले आहे. अपघात इतका भीषण होता की धडकेनंतर दुचाकीवर असलेली मुलगी हवेत उडली. त्यानंतर जमिनीवर आदळून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

दरम्यान मद्यधुंद अवस्थेत रात्री उशिरा वेगाने वाहन चालवण्याच्या घटना पुण्यात वाढत आहेत. कल्याणी नगर विमाननगर परिसरात रात्री उशिरापर्यंत हॉटेल व पब्ज सुरु असतात. एकीकडे रात्री उशिरापर्यंत सुरू असणाऱ्या आस्थापनांवर कारवाईचा आदेश पोलीस आयुक्तांनी दिलेले आहेत.

### मृत दोघे राजस्थानमधील

» पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम कंपनीच्या मालकाच्या अल्पवयीन मुलाने अत्यंत बेदरकारपणे आलिशान गाडी चालवत रस्त्यावरील वाहनांना धडक दिली. यामध्ये दोघांना चिरडले. अपघातातील अनिस अवलिया याचा उपचार सुरू असताना तर अश्विनी कोस्ता हिचा जागीच झाला. हे दोघेही राजस्थानमधील होते.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अश्विनी आणि अनिस हे दोघेही त्यांच्या मोटारसायकल वरून कल्याणीनगरकडून येरवड्याकडे मित्रांसह जात होते. त्यावेळी पोर्से या आलिशान कार याच रस्त्याने भरधाव वेगात निघाली होती. कारमधील चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर या गाडीने मोटारसायकल आणि इतर वाहनांना धडक दिली. यामध्येच दोघांचा मृत्यू झाला.

# भोसरीत कोयता गँगचा धुडगूस, दोघांना मारहाण

## नवनवीन भाईंची दहशत पोलिसांनी मोडून काढावी अशी अपेक्षा सर्वसामान्य व्यक्त करु लागले आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

जुन्या भांडणातून सहा जणांच्या टोळीने दोघांना कोयत्याने बेदम मारहाण केली. कोयता हवेत फिरवून 'आम्ही इथले भाई आहोत' असे म्हणत परिसरात दहशत निर्माण केली. ही घटना १६ मे रोजी सायंकाळी भोसरीतील चक्रपाणी वसाहतीत घडली.

जुन्या भांडणातून सहा जणांच्या टोळीने दोघांना कोयत्याने बेदम मारहाण केली. कोयता हवेत फिरवून 'आम्ही इथले भाई आहोत' असे म्हणत परिसरात दहशत निर्माण केली. ही घटना १६ मे रोजी सायंकाळी भोसरीतील चक्रपाणी वसाहतीत घडली.



यापुकरणी ओंकार मल्हारी दळवी (वय २२, रा.दिघी), योगेश जगन्नाथ मुळे (वय २१), गणेश कृष्णा गवारी ( वय १९, दोघे रा. चक्रपाणी वसाहत, भोसरी), विजय विरेंद्र चव्हाण (वय १८, रा.सद्गुरूनगर, भोसरी) या चौघांना अटक केली आहे. तेजस डोंगरे आणि सचिन येरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विशाल विठ्ठल साळवे (वय १९, रा. भोसरी) याने भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी विशाल हा भोसरीतील देवकर वस्ती येथे थांबला होता. त्यावेळी आरोपी योगेश, विजय तेथे आले. जुन्या भांडणाचा राग मनात धरून विशालसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. योगेशने ओंकारला बोलावून घेतले. आरोपी ओंकार याने हातात कोयता घेऊन तुम्ही आमच्या गँगला दम देता काय असे म्हणत शिवीगाळ केली. आरोपींनी विशाल याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच विशालचा साथीदार लक्ष्मण आखाडे याला पकडून ठेवले. आरोपी ओंकार याने विशालच्या पाठीत आणि लक्ष्मण याच्या डोक्यात कोयता मारून गंभीर जखमी केले. तसेच कोयता हवेत फिरवून मी आताच 'मोक्का'मधून बाहेर आलो आहे, आम्ही इथले भाई आहोत असे म्हणत परिसरात दहशत निर्माण केली. भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

नागरिकांनी सांगितले की, दोन गटातील वाद सोडवण्याचा प्रयत्न केल्यास तरुणांकडून मध्यस्थी करणाऱ्यावर हल्ला केला जातो. त्यांच्या वाहनांची तोडफो केली जाते. त्यामुळे या भांडणात कोणी हस्तक्षेप करत नाहीत.

महिला, लहान मुले आणि नागरिक मोठ्या दहशतीखाली आहेत. असे प्रकार नियमित घडत असून, पोलीस या गुंडांवर कोणतीही कारवाई करत नसल्याचा आरोप येथील स्थानिक नागरिकांनी केला आहे. गेल्या काही दिवसांपासून पुणे शहर आणि परिसरात दिवसेंदिवस कोयत्याची दहशत वाढत आहे.

### कोयताची विक्री करताना आधारकार्डची सक्ती

» कोयता गँगच्याविरोधात पुणे पोलिसांकडून मागील काही महिन्यांपासून धडक कारवाया सुरु आहेत. या गँगचा म्होरक्यासह अनेक जणांना अटक करण्यात आली आहे. काही जणांवर मकोका लावण्यात आला आहे. काही जणांना हद्दपार करण्यात आले आहे. कोयताची विक्री करताना आधारकार्डची सक्ती करण्यात आली आहे. या सर्वउपायानंतरही कोयता गँगची दहशत कमी होताना दिसत नाही.

### परिसरात कोयता गँगची दहशत

» या आधी पुण्याच्या गोऱ्हे बुद्रूक परिसरात देखील कोयता गँगने मोठी दहशत पसरवली होती. कोयता गँगमधील ४ ते ५ जणांनी तीन जणांवर हल्ला केला होता. या हल्ल्यात तिघेही गंभीर जखमी झाले होते. दहशत पसरवण्याच्या उद्देशानेच हा हल्ला करण्यात आल होता. या प्रकरणी पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतलंय.

# अवकाळीच्या सावटाखाली मशागतीच्या कामाने घेतला वेग

## मावळमध्ये मशागतीच्या कामाला आधुनिक पद्धतीचा वापर; एकरी दोन हजार रुपये खर्च

**पिंपरी | प्रतिनिधी**

खरीप हंगाम तोंडावर आल्यामुळे शिवारातील पेरणीपूर्वीच्या मशागतीच्या कामाला वेग आला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर, नवनवीन बी बियाणे, शेणखत, रासायनिक खतांचा वापर, आधुनिक तंत्रज्ञानयुक्त लागवड पद्धतीचा वापर करून आपल्या आर्थिक उत्पादनात कशी वाढ करता येईल, या आशेने परिसरातील शेतकऱ्यांनी अवकाळीच्या सावटातच मशागतीच्या कामांना सुरुवात केली आहे. मावळ तालुक्यात ट्रॅक्टरद्वारे नांगरणीसाठी एकरी दोन हजार रुपये खर्च येत आहे.



बैल जोडीच्या मदतीने अनेक शेतकरी आपल्या शेतीची मशागत करतात. मात्र ज्यांच्याकडे बैल जोडी नाही, त्यांना बैलजोडीचा शोध घ्यावा लागतो. शिवाय बैलजोडीने मशागत करताना अधिक वेळ लागत असतो. त्यामुळे ट्रॅक्टरने शेतीची मशागत केली जात आहे. नांगरणी खोलवर होते. त्यामुळे शेतकऱ्यांचा कल ट्रॅक्टरद्वारे जमिनीची मशागत करण्यावर दिसून येतो.

उन्हाळ्याच्या दिवसात गेल्या काही दिवसांपासून अवकाळीमुळे अगदी पावसाळ्याचा "फील" येत आहे. अवकाळी पावसाच्या सावटातच शेतकरी नव्या जोमाने खरीप हंगामाच्या तयारीला लागलेले आहेत. शेतीची मशागत केली जात आहे. शेतातील काडी-कचरा उचलून जमिनी तयार करण्यात येत आहेत. तसेच खतांची व्यवस्था देखील शेतकरी करीत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून गारपीट, वादळवारा व अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेती मशागतीची कामे बऱ्याच प्रमाणात खोळंबलेली होती. परिणामी आंदर मावळ, नाणे मावळ आणि पवन मावळ परिसरातील शिवारात पेरणीपूर्व मशागतीला शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा सुरुवात केली आहे.

मावळ तालुक्यातील खरिप हंगामातील पिकांवर अवलंबून असणारे कोरडवाहू शेतकरी तसेच सिंचन व्यवस्था असलेल्या शेतकऱ्यांची रब्बी पिकांच्या काढणीची सर्व कामे पूर्ण झाली. नेहमीप्रमाणे मृग नक्षत्रात पावसाचे आगमन झाले की पेरणीला सुरुवात होते.

### बैलांच्या दावणी रिकाम्या

» पारंपारिक पद्धतीने शेतीची नांगरट आता काळाच्या पडद्याआड गेली आहे. तयासाठीच्या बैलजोड्या देखील फार कमी दिसतात. पूर्वी एका शेतकऱ्याच्या दावणीला एक किंवा दोन जोड्या बैल असायचे बदलती शेती आणि महागाईमुळे बैलजोड्या टिकविणे जिकिरीचे होऊन बसले आहे. परिणामी ट्रॅक्टरची संख्या वाढली आणि शेतकऱ्यांच्या दारातील दावणी रिकाम्या झाल्या. त्यामुळे एकप्रकारे ग्रामीण संस्कृतीला घरघर लागली आहे..

# वरंध घाट पुन्हा बंद असणार पर्यायी मार्ग

## घाटीतल कामे सुरू आल्याने हा रस्ता पुन्हा एकदा वाहतुकीसाठी बंद करण्यात आला

**पुणे | प्रतिनिधी**

1 मे पासून काही दिवसांकरीता हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पुन्हा खुला करण्यात आला होता. परंतु आता पुन्हा एकदा घाटीतल कामे सुरू करण्यात आल्याने हा रस्ता पुन्हा एकदा वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

पुणे शहरातून कोकणात जाणाऱ्या लोकांसाठी महत्वाची बातमी आहे. आता त्यांच्यासाठी वरंध घाट बंद करण्यात आला आहे. भोरमार्गे महाडला जाणाऱ्या वरंध घाट मार्गावरची सर्व प्रकारची वाहतूक पुन्हा बंद करण्यात आली आहे. वरंध घाटातील रायगड जिल्ह्याच्या हद्दीत 21 किलोमीटर लांबीच्या रस्त्याची कामे पुन्हा सुरु करण्यात येत आहेत. त्यामुळे वाहतूक बंद करण्यात आली.

शनिवारी १८ मे आणि रविवारी १९ मे रोजी पुणे मुंबई एक्स्प्रेस दीड तासांसाठी बंद राहणार आहे. पुणे मुंबई एक्स्प्रेस हायेववरील ओव्हरहेड ग्यांट्रीच्या तांत्रिक तपासणीसाठी ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे सकाळी 10.30 ते दुपारी 12 पर्यंत मुंबईकडून पुण्याकडे येणारी वाहतूक बंद राहणार राहणार आहे. पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे बंद दरम्यान सर्व वाहतूक जुन्या पुणे मुंबई महामार्गावरून वळविण्यात येणार आहे. वाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन महामार्ग पोलिसांनी केले आहे.

वरंध घाट पुन्हा बंद करण्यात आला आहे. १ मे पासून काही दिवसांकरीता हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पुन्हा खुला करण्यात आला होता. परंतु आता पुन्हा एकदा घाटातील कामे सुरू करण्यात आल्याने हा रस्ता पुन्हा एकदा वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. पुणे शहरातून कोकणात जाणाऱ्या लोकांसाठी महत्वाची बातमी आहे. आता त्यांच्यासाठी वरंध घाट बंद करण्यात आला आहे. भोरमार्गे महाडला जाणाऱ्या वरंध घाट मार्गावरची सर्व प्रकारची वाहतूक पुन्हा बंद करण्यात आली आहे. वरंध घाटातील रायगड जिल्ह्याच्या हद्दीत २१ किलोमीटर लांबीच्या रस्त्याची कामे पुन्हा सुरु करण्यात येत आहेत. त्यामुळे वाहतूक बंद करण्यात आली.



### आता फेऱ्याचा असणारा पर्यायी मार्ग वापरा

» पुण्यावरुन कोकणात जाण्यासाठी वरंध घाट हा शार्टकट मार्ग होतो. परंतु आता फेऱ्याचा मार्ग वाहनधारकांना वापरावा लागणार आहे. वाहनधारकांनी पुण्याकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-माणगाव-निजामपूर रोड-ताम्हाणी घाट-मुळशी पिरंगुट पुणे व पोलादपूर आंबेनळी घाट वाई मार्गे पुणे असा मार्ग वापरावा. तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-पोलादपूर-खेड-चिपळुण-पाटण-कराड-कोल्हापूर" असा मार्ग वापरावा.

### कोणती कामे होणार सुरु

» वरंध घाटात रस्त्याचे दुपदरीकरणं, संरक्षक भिंत बांधणे तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याची कामे सुरू आहेत. ही कामे सुरू असताना अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव 1 एप्रिल पासून 30 मे पर्यंत वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु लग्नसराई तसेच उन्हाळ्याची सुट्टी आणि निवडणुक पाहता कोकणात प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून घाटातील रस्ता सुरु करण्याची मागणी महाडचे आमदार भारत गोगावले यांनी केली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांसोबतच झालेल्या चर्चेनंतर 1 मे पासून काही दिवसांकरीता हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पुन्हा खुला करण्यात आला होता. परंतु आता पुन्हा एकदा घाटीतल कामे सुरू करण्यात आल्याने हा रस्ता पुन्हा एकदा वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

# ...तर नाही भाग घेता येणार बैलगाडा शर्यतीत

## टॅग नसलेल्या बैलांना बैलगाडा शर्यतीमध्ये सहभाग घेण्यास परवानगी नाही

**पुणे | प्रतिनिधी**

बैलगाडा शर्यत म्हणजे अस्सल मातीतील रांगडा खेळ. पण आता या मैदानात बाजी मारायची असेल तर अगोदर एक काम तुम्हाला करावं लागणार आहे. तसं हे काम फायद्याचंच आहे. पण हा नियम डावलून चालणार नाही, तेव्हा शर्यतीत भाग घेण्यापूर्वी हे काम तेवढं कराच.

बैलगाडा शर्यत म्हणजे एकदम मातीतील खेळं. रांगड्या गड्यांनी खिल्लारी बैलाच्या मशागतीने दम दाखवला की मिळवलं. मातीशी नाळ घट्ट करणाऱ्या या खेळाला दृष्ट लागली होती. पण आता समदं कसं व्यवस्थित झालंय. पण एक अजून नियम आलाय बघा. त्याशिवाय काळ्या आईच्या लेकराला या शर्यतीत भाग घेता येणार नाही. बघ बीगी बीगी जाऊन इतकं एक काम केलं की झालं. बैलगाडा शर्यतीत करा की आनंदाची उधळण, दाखवा दम. कोणी अडवलंय तुम्हाला. पण हा एक नियम जरुर पाळा. सर्जा-राजासाठी इतकं काम करावं लागतंय बघा.

इअर टॅग एक बारकोड पद्धती आहे, जी सॉफ्टवेअर मध्ये डेव्हलप केलेली आहे. त्याची नोंद भारत सरकारकडे असते. बाजार समिती, आठवडी बाजार खरेदी विक्री संघ, यांनी इतर पशुधनाची ही विक्री करताना हा इअर टॅग दिला आहे का नाही यावर लक्ष द्यावे लागणार आहे. नसेल तर अशा विक्रीवर बंदी घालावी, असा शासन आदेश आला आहे .शर्यतीत भाग घेण्यापूर्वी इअर टॅगिंग जरुर करुन घ्या.



### काय आहे महत्वाची अपडेट

» बैलगाडा शर्यतीसाठी महत्त्वाची बातमी आहे. कानाला बिल्ला (Ear Tag) नसलेल्या बैलाला शर्यतीत भाग घेता येणार नाही. टॅग नसलेल्या बैलांना बैलगाडा शर्यतीमध्ये सहभाग घेण्यास परवानगी देऊ नये असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहे. ईअर टॅग नसल्यास पशुधनाची खरेदी विक्री ही करता येणार नाही. 1 जून पासून एअर टॅग बंधनकारक असल्याचे शासनाने परिपत्रक काढले आहे.

### काय आहे हा प्रकार

» केंद्र सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने 'नॅशनल डिजिटल लाईव्हस्टॉक मिशन' (NDLM) ही भारत पशुधन प्रणाली आणली आहे. या प्रणालीनुसार जनावराच्या कानाला एक टॅग लावण्यात येतो. त्यात एक 12 अंकी बारकोड असतो. यामध्ये पशुची जन्म आणि मृत्यूची नोंद घेण्यात येते. रोग प्रतिबंधात्मक लसीकरण आणि औषधोपचार, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क हस्तांतरण याची नोंद ठेवण्यात येते. पशुधनाचे प्रजनन, त्याचा मालक, जन्म-मृत्यू, आजार, त्यावर केलेले उपचार आदींची माहिती ठेवण्यात येते. म्हणजे जनावराची समंदी हिस्ट्रीच जमा करण्यात येते म्हणा की, एखाद्यावेळी जनावर आजारी पडलं तर आपल्याला यापूर्वी हा रोग त्याला कधी झाला होता, हे कळतं.